महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक अकोला, यांचे कार्यालय
Phone No.0724/2435500, Fax No. 0724/2445317
E-mail: os.pol.akola@mahapolice.gov.in

---

क्रमांक:- पोअअ/प्रलि-आस्था/३३-क/पो.भ.-२२-२३/नेमणुक-०२/ 10825/२०२४ अकोला दिनांक:- 3-SEP-2024

---

## आ दे श

पोलीस भरती सन २०२२-२३ मधील अकोला जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई च्या रिक्त पदावर खालील नमुद उमेदवारांची पोलीस शिपाई पदाकरीता निवड केलेली आहे.

सदर उमेदवार यांना जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा सामान्य रूग्णालय अकोला यांनी वैद्यकीय तपासणी अंती पोलीस शिपाई पदाकरीता पात्र ठरविलेले आहे. तसेच त्यांचे चारीत्र्य पडताळणी तपासणीत पोलीस अभिलेखावर कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून न आल्याने मुंबई पोलीस नियमावली १९५९ मधील नियम कमांक ७८ चे तरतुदी नुसार त्यांची **खालील नमुद अटीच्या अधिन राहुन** अकोला जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदावर वेतनमॅट्रीक्स रू.२१७००-६९१००/- अधिक रू. ७५०/-विशेष वेतन मध्ये **रू.२१७००/- अधिक रू. ७५०/- विशेष वेतन** या किमान वेतनावर व त्यावर नियमानुसार वेळोवेळी अनुज्ञेय भत्यावर पोलीस मुख्यालय अकोला येथे **हजर झाल्याचे दिनांका पासुन** पोलीस शिपाई पदावर अस्थायी स्वरूपात नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अकोला जिल्हा पोलीस दलाचा बक्कल क्रमांक देण्यात येत आहे.

| अ.क. | उमेदवाराचे नांव | पुरुष/महीला | बक्कल क्रमांक | नियुक्ती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | प्रतिश उमेश साबळे | पुरुष | २५९५ | इमाव |
| २ | जागृती गजाननराव शिंगारे | महीला | २५९६ | एसईबीसी |
| ३ | तेजस अनिल काळे | पुरुष | २५९७ | खुला |
| ४ | भिमराव भाउसाहेब किर्तीशाही | पुरुष | २५९८ | अजा |
| ५ | वैष्णवी बबनराव सुर्यवंशी | महीला | २५९९ | एसईबीसी |
| ६ | मनिषा गणेशराव चव्हाण | महीला | २६०० | एसईबीसी |
| ७ | साईनाथ नारायण नवले | पुरुष | २६०१ | खुला |
| ८ | प्रताप किसन ढेरे | पुरुष | २६०२ | भज-क |
| ९ | राहुल रमेश जाधव | पुरुष | २६०३ | अजा |
| १० | नाजिया शौकत शेख | महीला | २६०४ | ईडब्ल्युएस |

**नियुक्ती बाबत अटी:-**

| | |
|---|---|
| १ | देण्यात आलेली नेमणुक ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन ३(तीन) वर्षाचे आत (परिविक्षाधीन कालावधी) कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळुन आल्यास कारणे दाखवा नोटीस न देता अथवा कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास तात्काळ सेवेतुन कमी करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहतील |
| २ | पोलीस शिपाई पदावर नेमणूक झालेल्या उमेदवाराला मराठी/हिंदी भाषा परिक्षेत उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसेल तर, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील. |
| ३ | पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ **मधील नियम १३ नुसार संगणक हाताळणी बाबतचे** प्रमाणपत्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार नियुक्ती दिनांकापासुन २ वर्षाचे आंत **सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल.** |
| ४ | **महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम ३ (१)(ड) नुसार पोलीस शिपाई पदाकरीता मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम २ (२१) नुसार हलके वाहन चालविण्याचा (LMV) धारण करणे आवश्यक आहे सदर परवाना नसल्यास नियुक्ती दिनांकापासुन २ वर्षाचे आंत परवाना धारण न केल्यास सेवा समाप्त करण्यात येईल.** |

CamScanner

| | |
|---|---|
| ५ | पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ नुसार, पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व त्यासंबंधीच्या परीक्षा **जास्तीत जास्त चार संधीमध्ये** उत्तीर्ण कराव्या लागतील . जर उमेदवार एका संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण करू शकला नाही तर त्यास परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत पुढील वार्षिक वेतन वाढ देय होणार नाही. **जर चार संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत तर, त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.** |
| ६ | पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ नुसार पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवाराची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| ७ | पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ नुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना, मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम व कायदे लागू होतील. |
| ८ | शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)बारा, दि.२८.०३.२००५ अन्वये पोलीस शिपाई पदावर नेमणुकीच्या दिनांकास जर हयात मुलांची संख्या दोन आहे. परंतु पोलीस शिपाई पदावर शासकीय सेवेत रूजु झाल्यानंतर मुलांची संख्या जर, दोन पेक्षा अधिक झाल्यास नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी उमेदवारास अपात्र ठरवून त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. याबाबत उमेदवारास सदर शासन निर्णया अन्वये विहित केलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमूना ' अ' भरून देणे आवश्यक राहील. |
| ९ | शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दि.०१.११.२००५ नंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु टरेल मात्र सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से.निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम-१९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| १० | पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरून कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडुन प्रशिक्षणवर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहित वसुल करण्यात येईल. |
| ११ | नाव,जन्मतारीख,वयाची अट,पुर्व चारित्र पडताळणी (पोलीस रेकॉर्ड) शैक्षणिक पात्रता,जाती व जाती वैधता प्रमाणपत्र आरक्षणाचा लाभ घेण्याकरिता आवश्यक असणारी प्रमाणपत्रे व अन्य संबंधीत कागदपत्राची छाननी केल्यानंतर काही आक्षेपार्ह बाब आढळुन आल्यास आपणास केव्हाही व कसल्याही प्रकारची पुर्वसुचना न देता सेवेतुन कमी केले जाईल व त्या बाबत लाल शाईने प्रमाणपत्रावर प्रतिकुल शेरा नमुद करून पोलीस खात्यात/शासकीय नोकरीत नेमणुक देण्यास अपात्र म्हणुन नोंदणी करण्यात येईल. |
| १२ | पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे स्थायी आदेश क्रमांक २२/२०१३ दिनांक १७/०८/२०१३ अन्वये पोलीस शिपाई यांच्या सेवा ज्येष्ठतेबाबत असे आदेशित केले आहे की,पोलीस भरतीच्या वेळी घेण्यात येणा-या परिक्षेत उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या गुणवत्तेच्या क्रमानुसार पोलीस शिपाई संवर्गातील कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता लावण्यात यावी असे आदेशीत करण्यात आले आहे. त्या नुसार उपरोक्त उमेदवारांची सेवा जेष्ठता लावण्यात येईल. |
| १३ | शासन निर्णय साप्रवि क्र.बीसीसी २०११/प्र.क्र १०६४ /२०११/ १६-ब दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार जे उमेदवार आरक्षित पदावर नियुक्त झालेले आहेत. त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समिती कडुन करुन घेणे आवश्यक आहे. **सहा महिन्याच्या आत जात वैधता पडताळणी न केल्यास तसेच जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास नियुक्ती आदेश रदद करण्यात येईल.** |
| १४ | सदरचे आदेश निर्गमित होताच दिनांक ०८/०९/२०२४ रोजी आपणांस कर्तव्यावर हजर होणे बंधनकारक राहील. |

(बच्चन सिंह)
**पोलीस अधीक्षक,अकोला**

प्रति, **संबधीत उमेदवार**

प्रतिलिपी:- राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, अकोला/भांडारपाल, मुख्यालय /पगार लिपीक-२/ सीबी-१ / सीबी-५ / डि.सी.पी.एस.लिपीक/ डिपीजी लिपीक/मेस इंचार्ज, मुख्यालय / पगार पट, पोलीस मुख्यालय यांना माहिती व उचित कार्यवाही करीता रवाना

**सीबी-५ :- उपरोक्त नमुद कर्मचा-यांना नियमानुसार किट संरजाम करिता अनुदान मंजुर करण्यात यावे.**

CamScanner